**<u>महत्त्वाचे</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८. लेखा विभाग
क्र.लेखा/६/कावि/८६ /२०१५
दिनांकः- ४ /६ /२०१५

**विषय :- अंदाजपत्रकीय तरतुदीचे वर्गीकरणबाबत...**

**परिपत्रक,**

सन २०१५-२०१६चे अंदाजपत्रकामध्ये भांडवली खर्चासाठी "अ""प" व "क" असे विभाग असून महसूली खर्चासाठी अ, प, क असे विभाग आहेत. सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकास मा. महापालिका सभेने उपसूचनांसह मंजूरी दिलेली आहे. मा.महापालिका सभेने उपसूचनांसह मंजूरी दिलेले अंदाजपत्रकाच्या प्रती स्थापत्य,विद्युत,पाणीपुरवठा / जलनिःसारण,पर्यावरण,उद्यान, स्थापत्य, भूमी संपादन, विभागांना पूढील कार्यवाही साठी दिलेल्या आहे. भांडवली अंदाजपत्रकामध्ये स्थापत्य, विद्युत, भूसंपादन, उद्यान, पर्यावरण (अ) हे विभाग अंदाजपत्रक "अ" मध्ये समाविष्ट होतात, तर पाणीपुरवठा जलनिःसारण, पर्यावरण "क" हे विभाग "क" अंदाजपत्रकात येतात आणि शहरी व गरिबांसाठी "प" अंदाजपत्रकात स्थापत्य + विद्युत प हे विभाग येतात. अ,क, व प चे अंदाजपत्रक स्वतंत्र असल्याने त्यातुन एकमेकात वर्गीकरण करता येत नाही. तथापि आमचे असे निदर्शनास आले आहे की, अंदाजपत्रक मंजूरी नंतर विभागामार्फत अ अंदाजपत्रकातून क अंदाजपत्रकात, क अंदाजपत्रकातून "प" अंदाजपत्रकात तसेच भांडवली अंदाजपत्रकातून महसूली अंदाजपत्रकात, महसूली अंदाजपत्रकातून भांडवली अंदाजपत्रकात तरतूदी वर्गीकरण प्रस्तावित करुन परस्पर मा. आयुक्त यांचेकडे प्रस्ताव सादर केले जातात. परंतु अशा प्रकारे अंदाजपत्रकात चुकीचे वर्गीकरण करणे नियमाधीन होत नाही.

तरी यापूढे सर्व संबंधित शाखाप्रमुख तसेच लेखाधिकारी, लेखाविषयक कामकाज पहाणारे संबंधित कर्मचारी यांनी **<u>अंदाजपत्रकीय तरतूद वर्गीकरणाची प्रकरणे मुख्यलेखापाल, लेखा विभाग यांचे अभिप्राय घेवूनच मा. आयुक्त यांचेकडे मान्यतेसाठी पाठविली जातील याबाबत दक्षता घ्यावी.</u>**

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

प्रति,
सर्व संबंधित विभागप्रमुख
...................... विभाग